# राष्ट्रीय सेवा योजना

# विशेष श्रमसंस्कार शिबीर - २०२१-२२

## ♦ अहवाल ♦

- ठिकाण : मौजे तळंदगे
- कालावधी : १५ मार्च २०२२ ते २१ मार्च २०२२
- सहभागी स्वयंसेवक : १०० ( मुले :  , मुली :  )

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये प्रथम सत्रात राष्ट्रीय सेवा योजना विभाग मा. प्राचार्याच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत झाला. या विभागात एकूण २ युनिट ( २०० स्वयंसेवक ) आहेत. यातील १ युनिट (१०० स्वयंसेवक) हे विशेष श्रमसंस्कार शिबीरासाठी निवडले जाते. या सात दिवसीय श्रमसंस्कार शिबीरातून स्वयंसेवकांना समाजामध्ये राहून नेमक्या गाव पातळीवरील समस्या, जबाबदाऱ्या काय आहेत याची जाणीव होऊन त्यादृष्टीने त्यांचे व्यक्तिमत्त्व विकसित करणे आणि श्रमदानातून, बौध्दिक व्याख्यानातून तसेच वेगवेगळ्या उपक्रमातून स्वत:चा तसेच समाजाचा आत्मविश्वास विकसित करण्यासाठी व विकास करण्यासाठी प्रयत्न या श्रमसंस्कार शिबीराच्या माध्यमातून केला जातो.

यास अनुसरून महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या दत्तक घेतलेल्या मौजे तळंदगे येथील गावात दि. १५ मार्च २०२२ ते २१ मार्च २०२२ या कालावधीत विशेष श्रमसंस्कार शिबीर संपन्न झाले. या शिबीरातील घेण्यात आलेल्या सर्व उपक्रमांचा अहवाल पुढीलप्रमाणे :

१. मंगळवार दि. १५ मार्च २०२२ - या दिवशी प्रमुख पाहुणे मा. प्राचार्य डॉ. एच.एस.वनमोरे (माजी समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर) यांच्या हस्ते उद्‌घाटन समारंभ संपन्न झाला. तसेच स्वयंसेवकांना निवासी ठिकाणची स्वच्छता केली.

२. बुधवार दि. १६ मार्च २०२२ — मौजे तळंदगे येथील प्रसिध्द जगन्नाथ मंदिर परिसरातील झाडांना आळी करण्याचे काम स्वयंसेवकांनी केले तसेच संपूर्ण मंदिर परिसर स्वच्छ केला. व्याख्यानमालेच्या कार्यक्रमात मा. बाबासाहेब नदाफ (हेरवाड) यांचे "बलशाली राष्ट्रासाठी बलशाली युवक " या विषयावर व्याख्यान झाले. यानंतर सायंकाळी शांततेचा संदेश देणारी मौन मेणबत्ती रॅली संपूर्ण गावातून आयोजित करण्यात आली. यामध्ये आजी-माजी विद्यार्थी, ग्रामस्थ यांनी सहभाग घेतला. रॅली सांगता तळंदगे गावच्या ग्रामपंचायतीसमोरील चौकात क्रांतीकारी गीते गाऊन आणि घोषणा देऊन झाली.

३. गुरुवार दि. १७ मार्च २०२२ - तळंदगे येथील गावच्या प्रवेशद्वारापासून स्वयंसेवकांनी रस्ता, गटार स्वच्छता केली. त्याचबरोबर गावातील बिरोबा मंदिर परिसर व प्राथमिक आरोग्य उपकेंद्राची संपूर्ण स्वच्छता यावेळी स्वयंसेवकांनी केली. प्रबोधनपर व्याख्यानमालेच्या कार्यक्रमात मा.प्रा.डॉ. विजय माने (एम.एस.डब्ल्यू. कॉलेज, सातारा) यांचे "प्रदुषण मुक्त भारत : स्वस्थ भारत " या विषयावर व्याख्यान झाले. यावेळी विद्यार्थ्यांनी घरोघरी जावून होळीविषयी जनजागृती करून होळी पेटवताना त्यात पोळी न टाकण्याचे आवाहन केले.

४. शुक्रवार दि. १८ मार्च २०२२ - मौजे तळंदगे येथील प्रसिध्द असणाऱ्या जगन्नाथ मंदिर येथील असणाऱ्या झाडांची आळी करण्याचे काम, तसेच तलाव स्वच्छतेचे काम स्वयंसेवकांनी केले. दुपारी १२.०० वा. प्राथमिक आरोग्य केंद्र, पट्टणकोडोली व उपकेंद्र तळंदगे यांच्या संयुक्त विद्यमाने गावातील महिला

तसेच स्वयंसेविकांसाठी महिला आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले. यावेळी श्री.........माने यांनी महिलांच्या आरोग्याविषयी माहिती दिली. या कार्यक्रमात ........................ उपस्थित होते. प्रबोधनपर व्याख्यानमालेत यावेळी मा. शरद आजगेकर (सामाजिक बांधिलकी अधिकारी, किर्लोस्कर ऑईल इंजिन्स लि. एम.आय.डी.सी.) यांचे "पर्यावरण आणिआजचा युवक " या विषयावर व्याख्यान झाले. सायंकाळी "मोबाईल आणि युवक" या विषयावर गट चर्चा घेण्यात आली.

५. शनिवार दि. १९ मार्च २०२२ - यादिवशी प्राथमिक मराठी शाळेच्या पलिकडे असणाऱ्या मोठ्या मैदानाची, गावात असणाऱ्या कब्रस्थानची आणि गावाबाहेर असणाऱ्या स्मशानभूमीची स्वच्छता स्वयंसेवकांनी केली. तसेच या ठिकाणच्या बाहेरील परिसरही विद्यार्थ्यांनी स्वच्छ केला. व्याख्यानमालेच्या कार्यक्रमात मा.प्रा.डॉ.संभाजी गावडे (छ. शिवाजी कॉलेज, सातारा) यांचे "स्वच्छता हाच परमेश्वर" या विषयावर तर मा.प्रा.संदीप पोळ (रिसर्च फेलो, सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे) यांचे "स्वच्छ भारत" या विषयावर व्याख्यान झाले.

६. रविवार दि. २० मार्च २०२२ - यादिवशी गावातील प्रसिध्द जगन्नाथ मंदिर येथे असणाऱ्या तलावाची आणि तलावाच्या आसपासच्या परिसरातील पूर्ण स्वच्छता स्वयंसेवकांनी केली. प्रबोधनपर व्याख्यानमालेच्या कार्यक्रमात मा.प्रा.डॉ.चंद्रकांत गिरी (रा.छ.शाहू कॉलेज, कोल्हापूर) यांचे "सदृढ भारतासाठी स्वस्थ युवक " या विषयावर व्याख्यान झाले. यावेळी सायंकाळी प्रबोधनात्मक सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्ण्यात आले. याचे उद्घाटन हुपरी पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक मा. पंकज गिरी आणि मा. सरपंच सौ. जयश्री भोजकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स्वयंसेवकांनी अनेक प्रबोधनात्मक सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

७. सोमवार दि. २१ मार्च २०२२ - या दिवशी प्राथमिक कुमार विद्या मंदीर आणि कन्या विद्या मंदीर तळंदगे या शाळांच्या वर्गखोल्या तसेच शाळेचा पूर्ण परिसर, मैदान आणि गावाला पाणी पुरवठा करणाऱ्या पाण्याच्या टाकीचा पूर्ण परिसर स्वच्छ करण्यात आला.

यावेळी सायंकाळी शिबीराचा समारोप कार्यक्रम घेण्यात आला. समारोपाच्या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून तळंदगे गावचे ग्रामविकास अधिकारी मा.श्री.एस.पी.कांबळे यांनी मार्गदर्शन केले.

या सात दिवसाच्या विशेष श्रमसंस्कार शिबीरास महाविद्यालयाच्या प्राचार्या मा.डॉ.सौ.पी.बी.पाटील तसेच राष्ट्रीय सेवा योजनेतील सदस्य श्रीमती जे.एल.बनसोडे, प्रा. बी.बी.जाधव, प्रा.आर.एस.सुतार, प्रा.डी.सी.तुळशीकट्टी, प्रा.के.आय.मुल्लाणी, प्रा.डॉ.आय.एच.मुल्ला, कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.विजय पाडळकर तसेच सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर सेवक यांचे सहकार्य लाभले. दत्तक गाव तळंदगे येथील सरपंच मा.सौ.जयश्री भोजकर, उपसरपंच मा.श्री.रंगराव धनगर, ग्रामविकास अधिकारी मा.श्री.एम.पी.कांबळे, श्री.धैर्यशील चौगुले, सर्व ग्रामपंचायत सदस्य, कार्यालयीन सेवक, तळंदगे येथील तरुण मंडळे, विकास सेवा सोसायटी, दुध संस्था, क्रिडा व शैक्षणिक संस्था, सांस्कृतिक मंडळे, महिला बचत गट व सर्व ग्रामस्थ यांचे अनमोल सहकार्य लाभले. महाविद्यालयातील सर्व आजी-माजी विद्यार्थी व शिबीरातील सर्व सहभागी स्वयंसेवकांचे मौल्यवान सहकार्याने हे शिबीर संपन्न झाले.